**Lang. Code : 11**

इस पुस्तिका में **16** पृष्ठ हैं ।
This booklet contains **16** pages.

# TAJ 19-I

**प्रश्न-पत्र I / PAPER I**

**मराठी भाषा परिशिष्ट**

**Marathi Language Supplement**

**भाग IV & V / PART IV & V**

परीक्षा पुस्तिका संकेत
**Test Booklet Code**

**P**

परीक्षा पुस्तिका संख्या
**Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 15 व 16)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 15 & 16) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें । / For instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **P** । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा I - (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा II - (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **P**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language I - (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language II - (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) ____________________
Roll Number : in figures
: (शब्दों में) ____________________
: in words

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature : Invigilator's Signature :

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

**P**

**Lang. Code : 11**

ही पुस्तिका 16 पानांची आहे.

# TAJ 19-I

**प्रश्नपत्रिका I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**P**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (15 आणि 16) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थीसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I, भाग II आणि भाग III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड P** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू**-2 वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग** IV **: भाषा** I **– (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग** V **: भाषा** II **– (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

: शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120),** if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

# भाग – IV
## भाषा – I
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा** – I चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्र. 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

दत्तू गावात कधी आला, कुणाबरोबर आला याच्या विविध वदंता होत्या. कुणी काहीही म्हणे. गावात आलेल्या वरातीसोबत तो आला; गावाजवळून जाणाऱ्या वारीतल्या एका दिंडीत तो सामील होता, नजरचुकीनं गावात आला; त्याला एका मालट्रकनं सडकेला सोडत गावाचा रस्ता दाखवला, वगरे.. नेमकं कुणालाच ठाऊक नव्हतं. गावात अनोळखी माणूस आल्यावर त्याच्याकडं संशयानं न पाहता त्याला सहानुभूतीनं पाहण्याचा तो काळ होता. दत्तूला विचारावं म्हटलं तर अडचण होती. तो काहीसा गतिमंद होता. बोलताना अडखळायचा. त्याला खळखळून हसताना वा फडाफडा बोलतानाही कुणी पाहिलं नव्हतं.

कालांतरानं दत्तू साऱ्या गावाचा पाणक्या झाला. गावातल्या तालेवार लोकांच्या घरी पाणी भरून त्याच्या दोन्ही तळहातांना घट्टे पडलेले. सतत पाण्यात हात घालून त्याच्या हाताची त्वचा पांढुरकी झालेली. जाड खाकी रंगाची हाफपँट, मांजरपाटाची बिनबाह्यांची जाडीभरडी छाटी हा त्याचा कायमचा वेश. सणासुदीलादेखील त्यात बदल नव्हता. दत्तू दिसायलाही ओबडधोबडच होता. वर्णानं काळासावळा.

कोंबडा आरवायच्या आधी हा आडावर गेलेला असे. आडावर पाणी भरायला येणाऱ्या बायकांशी त्याचं कधीच भांडण झालं नाही. उजव्या हातानं खांद्यावर मोठी घागर अन् डाव्या हातात कळशी राही. ऊन, वारा, पाऊस...कशाचीही तमा न करता बारमाही हे काम करायचा.

दत्तूला गावातल्या वीसेक घरांची वर्दी होती. त्या घरात पाणी ओतताना त्याचा वावर फक्त उंबरठ्यापासून हौदापर्यंत असायचा. कुठं ओट्यावरची पोती मागंपुढं करावी लागत, सरपण फोडून द्यावं लागे, ओझं उचलावं लागे. विठ्ठलाच्या मंदिरातच त्याचा मुक्काम असे. रात्री कीर्तनास येणाऱ्या टाळकुट्या लोकांच्या शेजारी बसून तो मान हलवत राही.

दत्तूचं लग्न काही झालं नाही. त्यानं कोणत्या बाईकडे नजर वाकडी करूनही बघितलं नाही. त्यावरून काही मंडळी टिंगल करत, टोमणे मारत. दत्तूला त्याचं काही वाटत नसे. तारुण्याच्या उंबरठ्यावरच्या वयात दत्तू गावात आलेला, तेव्हा आडाला भरपूर पाणी होतं. चार रहाट चौदिशेने चालत, पण पाणी तळाला कधी गेलं नव्हतं. सत्तरीपार थकल्यानंतरही हार न मानलेल्या दत्तूनं पाणी भरणं बंद केलं नव्हतं. एके दिवशी विठ्ठलाच्या ओट्यावर पाण्याची घागर ओतताना त्याला चक्कर आली, तो खाली पडला. सगळीकडे पाणीपाणी झालं. त्यात पाय घसरून पायऱ्यावरून घरंगळत खाली आला. त्याला लकवा मारल्यागत झालं. वर्षभर खिळून होता तो. दत्तूचे श्वास जड झाले. त्या रात्रीचं चांदणं लिंबाच्या झाडाआड लपून ओक्साबोक्शी रडलं. आडातल्या पाण्याला हुंदके अनावर झाले. शेतशिवारातल्या गायींच्या डोळ्यांना झरे फुटले. मंदिराचा कळस काळ्याजांभळ्या आभाळात गुदमरून गेला. आयुष्यभर त्यानं खांद्यावर वागवलेल्या घागरी-कळशांना कंठ फुटले. तांबडफुटी व्हायच्या सुमारास त्याचं प्राणपाखरू उडून गेलं.

91. दत्तूच्या गावात येण्या संबंधी कोणती शक्यता लेखकाने वर्तविली नाही ?

(1) वराती शिवाय आला

(2) वारीच्या दिंडीतून आला

(3) नजरचुकीनं आला

(4) ट्रक मालकाने गावात आणला

92. दत्तू वर्षभर कोणते काम करीत असे ?

(1) खळखळून हसायचे

(2) फडाफडा बोलायचे

(3) कीर्तनात टाळ वाजवायचे

(4) गावात पाणी भरण्याचे

93. तमा बाळगणे म्हणजे काय ?

(1) धीटपणा असणे

(2) काळजी करणे

(3) पर्वा करणे

(4) शरम राखणे

94. 'वदंता' शब्दाचा समार्थी शब्द सुचवा.

(1) अफवा

(2) वंदना

(3) भावना

(4) वानवा

95. 'उजव्या हातानं खांद्यावर मोठी घागर आणि डाव्या हातात कळशी.'

या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

(1) अव्यय

(2) अलंकार

(3) विशेषण

(4) सर्वनाम

96. दत्तू गावातल्या किती घरात पाणी भरीत असे ?

(1) दहा

(2) वीस

(3) पंचवीस

(4) तीस

97. गावातली मंडळी कोणत्या कारणास्तव दत्तूची चेष्टा करीत असत ?

(1) पाण्याची घागर ओतताना चक्कर आली म्हणून

(2) दिसायला ओबड-घोबड होता म्हणून

(3) त्याचं लग्न झालं नव्हतं म्हणून

(4) बायकांशी त्याचं कधीच भांडण झालं नाही म्हणून

98. पूर्वीच्या ग्रामसंस्कृतीचे कोणते वैशिष्ट्य लेखकाने सांगितले आहे ?

(1) पाहुण्यांशी तुसडेपणाने वागणे

(2) अपरिचिताशीही सहानुभूतीने वागणे

(3) अनोळखी माणसाला हुसकावणे

(4) परस्परांशी नजर चुकवणे

99. 'कोंवडा आरवणे' या वाक्यातून लेखकाला कोणती वेळ सुचवायची आहे ?

(1) आडावर पाणी भरावला जायची

(2) भल्या पहाटेची

(3) सरपण फोडून देण्याची

(4) बारमाही काम करायची

**पुढील पद्यांश वाचा आणि प्रश्न क्र. 100 ते 105 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे
जरतारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे

पांघरसी जरि असला कपडा
येसी उघडा जासी उघडा
कपड्यासाठी करिसीनाटक, तीन प्रवेशांचे

मुकी अंगडी बालपणाची
रंगीत वसने तारुण्याची
जीर्ण शाल मग उरे शेवटी, लेणे वार्धक्याचे

या वस्त्राते विणतो कोण ?
एक सारखी नसती दोन
कुणा न दिसले त्रिखंडात त्या, हात विणणाऱ्याचे.

**100.** 'तीन अंकी नाटक' यातून कवीला काय सुचवायचे आहे ?

(1) धागा, वस्त्र आणि माणूस

(2) जीवनातील तीन अवस्था

(3) त्रिखंड

(4) सुख, दुःख आणि आयुष्य

**101.** पुढीलपैकी कोणाचे अदृष्य अस्तित्व कवी सुचवतो ?

(1) वार्धक्य

(2) परमेश्वर

(3) नाटक

(4) त्रिखंड

**102.** जीवनातील कोणत्या शाश्वत सत्याकडे कवीने संकेत केला आहे ?

(1) बालपण आणि मौन

(2) तारुण्यावस्था व रंगीत वसने

(3) रिकाम्या हाती येणे व रिकाम्या हाती जाणे

(4) सुख आणि तारुण्य

**103.** जीर्ण शब्दाचा समानार्थी आशय असलेला पर्याय निवडा.

(1) जाजम

(2) जिणे

(3) मोडकळीस आलेला

(4) जिरणे

**104.** 'वसन' शब्दाची अर्थच्छटा नेमकी कोणत्या शब्दातून व्यक्त होते ?

(1) तोंड

(2) परिधान

(3) वसंत

(4) वर्ण

**105.** पुढीलपैकी कोणत्या दोन गोष्टी एकसारख्या नसतात असे कवी सुचवतो ?

(1) शाल आणि लेण

(2) दोन माणसं

(3) दोन वस्त्र

(4) दोन धागे

**योग्य पर्याय निवडून प्रश्न क्र. 106 ते 120 या प्रश्नांची उत्तरे द्या :**

**106.** **पहिल्या इयत्तेच्या भाषा पुस्तकात अगोदर वर्णमाला, दोन अक्षरी शब्द, तीन अक्षरी शब्द आणि नंतर कथा व कविता आहेत. या पुस्तकात भाषाध्यापन पद्धतीचा कोणता दृष्टिकोण आहे ?**

(1) बॉटम-अप पद्धती

(2) टॉप-डाऊन पद्धती

(3) अनुशासनात्मक पद्धती

(4) अभ्यासक्रम आधारित पद्धती

**107.** **वाचन अक्षमता म्हणजे ......**

(1) डिसलेक्सिया (Dyslexia)

(2) डिसग्राफिया (Dysgraphia)

(3) डिसकेलक्युलिया (Dyscalculia)

(4) डिस्फोरिया (Dysphoria)

**108.** **भाषा वर्गात लेखनाची सुरुवात करताना शिक्षिकेने काय केले पाहिजे ?**

(1) सांगितलेल्या विषयावर विविध बाजूंनी विचार करुन विचारांना चालना देण्यास विद्यार्थ्यांना सांगणे.

(2) विषयाशी संबंधित फळ्यावर लिहिलेला परिच्छेद लिहिण्यास सांगणे.

(3) विद्यार्थ्यांना शाळेत येताना वेगवेगळे परिच्छेद वाचून येण्यास सांगणे

(4) विद्यार्थ्यांना सुंदर अक्षरात लिहिण्यास सांगणे.

**109.** **मूल मातृभाषा प्रामुख्याने कोणत्या माध्यमातून आत्मसात करते ?**

(1) ऐकून

(2) बोलून

(3) लिहून

(4) औपचारिक शिक्षण पद्धतीतून

**110.** **पुढीलपैकी कोणती बाब उत्पादन क्षमतेशी संबंधित आहे ?**

(1) वाचन व लेखन

(2) वाचन व श्रवण

(3) संभाषण व लेखन

(4) संभाषण व श्रवण

**111.** **तिसऱ्या इयत्तेची वर्गशिक्षिका-करुणा, वर्गात कविता शिकवते आणि विद्यार्थ्यांकडून काही उपक्रम करुन घेण्याचे ठरवते. उपक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग मिळविण्यासाठी तिने पुढीलपैकी कोणती कृती करावयास सांगितले पाहिजे ?**

(1) विद्यार्थ्यांना कवितेच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगणे.

(2) विद्यार्थ्यांना कवितेचे झालेले आकलन सामूहिकपणे सांगण्यास सांगणे

(3) पुस्तकात आहे तशीच कविता पाठ करण्यास सांगने.

(4) कवितेत आलेल्या नवीन शब्दांच्या मदतीने वाक्य तयार करण्यास सांगणे.

**112.** **भाषा आत्मसात करण्याच्या संदर्भात कोणते विधान अचूक आहे ?**

(1) मुलांमध्ये भाषा आत्मसात करण्याची उपजत क्षमता नसते

(2) मुले शाळेत येतात तेव्हां भाषा आत्मसात करतात.

(3) प्रत्येक मुलात भाषा आत्मसात करण्याची उपजत क्षमता असते

(4) मुले वेगवेगळया माध्यमातून भाषा शिकतात.

**113.** **भाषा शिक्षणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्त्वपूर्ण आहे ?**

(1) अध्यापन-अध्ययन पद्धतीचा वापर (TLM)

(2) सामाजिक आंतरक्रिया

(3) पुस्तक वाचन

(4) नाटक किंवा चित्रपट पाहणे

**114. पाठात चित्र किंवा रेखांकनाचा वापर पुढीलपैकी कोणत्या कारणास्तव केला जातो ?**

(1) पुस्तकात किंवा पाठात चित्र देणे ही एक परंपरा आहे.

(2) यामुळे पाठ्य-पुस्तक आकर्षक होते.

(3) यामुळे साररूप संकल्पना समजून घेण्यास मदत होते.

(4) चित्र काढण्याच्या तुलनेत पाठ लिहीणे जास्त अवघड असते.

**115. विद्यार्थ्यांना लेखनाचा चांगला सराव होण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या कृतीवर शिक्षकाने सर्वात जास्त भर दिला पाहिजे ?**

(1) अक्षर

(2) व्याकरण

(3) अभिव्यक्ती

(4) शब्द मर्यादा

**116. शब्द वाचन-लेखन दोष (Dyslexia) कशाशी संबंधित आहे ?**

(1) मानसिक अक्षमता

(2) आचरण संबंधी अक्षमता

(3) संख्यात्मक अक्षमता

(4) वाचन अक्षमता

**117. पाठाचे वाचन करताना पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्त्वपूर्ण ठरते ?**

(1) निर्दोष उच्चारणासह वाचन

(2) विरामचिन्हांसह निर्दोष वाचन

(3) पाठाचे योग्य आकलन

(4) जलद वाचन

**118. दुसऱ्या इयत्तेची वर्गशिक्षिका 'ताशा' शब्द क्षमतेचा विकास होण्यावर खूप भर देते. शब्द क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने पुढीलपैकी कोणती कृती सर्वश्रेष्ठ कृती ठरेल ?**

(1) पुढील पाठ वाचण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी सर्व नवीन शब्द पाठ करणे.

(2) पाठाच्या संदर्भात विद्यार्थ्यांनी शब्दसंबंधी अनुमान व्यक्त करणे.

(3) विद्यार्थ्यांनी प्रत्येक कठीण शब्दाचा अर्थ शब्दकोशात पाहणे.

(4) विद्यार्थी प्रत्येक नवीन किंवा कठीण शब्दाला अधोरेखित करतात व नंतर त्यांचा अर्थ समजून घेतात.

**119. इयत्ता दुसरीची शिक्षिका वर्गात हावभावासकट गोष्ट सांगते. गोष्ट सांगून झाल्यावर ती काही विद्यार्थ्यांना तीच गोष्ट आपल्या शब्दांत सांगण्यास म्हणते. या उपक्रमातून शिक्षिकेला कोणत्या प्रकारचे मूल्यमापन अपेक्षित आहे ?**

(1) श्रवण आकलन

(2) मौखिक आकलन

(3) वाचन आकलन

(4) लेखन आकलन

**120. वर्गात मुद्रित सामग्रीची उपलब्धता म्हणजे ......**

(1) वर्गाच्या भिंती रंगीबेरंगी असणे

(2) वर्गात शिकविल्या जात असलेल्या संकल्पने संबंधीची सामग्री भिंतीवर चिकटवणे.

(3) मोठ्या अक्षरातील वर्णमालेचे तक्ते भिंतीवर लावणे.

(4) वर्गाच्या भिंतीवर विविध रंगात कविता सचित्र रंगवणे.

परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150),** if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

## भाग – V

## भाषा – II

## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा** – II चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 साठी योग्य पर्याय निवडा.**

आपल्याला नको असलेल्या गोष्टींचे विसर्जन करण्याचे अनेक प्रसंग आपल्या दैनंदिन जीवनात नेहमी घडत असतात, पण प्रत्येकावर तोडगा एकच .... वाहत्या पाण्यात विसर्जन करा ! देवावरची फुलं पानं, काही विधीत वापरलेलं अन्न, इतर पदार्थ एकदा का नदीत विसर्जन केले आणि तिथेच पाय धुवून डोळ्याला पाणी लावलं, की आपण पापमुक्त झालेल्या आनंदात घरी जायला मोकळे. इतकंच काय तर आपल्या संस्कृतीशी जोडल्या गेलेल्या गंगामाईत कोण काय विसर्जन करतात हे पाहिलं तर आपल्या लक्षात येईल, की आपण पवित्र मानतो त्या गंगा नदीचा जगातील मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झालेल्या पाण्याच्या स्रोतात बराच वरचा नबंर का लागतो. भारत सरकारनं यासाठीच एक प्रयत्न म्हणूनं गंगाप्रदुषण रोखण्यासाठी वेगळा विभागच बनवला आहे. परंतु हे झालं गंगेपुरतं मर्यादित. आपल्याकडील प्रत्येक नदीची हीच कथा आहे, मग ती कृष्णा असो किंवा गोदावरी असो किंवा आणखी कुठलीही नदी असो. खरं तर या नद्या जीवनदायिनी आहेत. त्यांच्याचमुळे त्यांच्या काठावर सुफलाम शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध झालं आहे , पण या नद्यांची व्यथा आपल्यापैकी फारच थोड्या लोकांना समजते.

संथ वाहते कृष्णामाई, काठावरल्या सुखदुःखांची जाणीव तिजला नाही ! मराठी चित्रपटातील हे गाजलेलं गाणं, पण आज त्याच कृष्णामाईची व्यथा पाहिली की तिच्याच सुखदुःखाची आपल्यालाच जाणीव नाही, असं खेदानं म्हणावं लागतं, कारण या पाण्यात काय काय मिसळतं हे वाचलं तर कदाचित तुम्ही पाणीही पिणार नाही. शेतातील पिकांवर अनेक प्रकाराचे रोग पडतात. मग त्यावर उपाय म्हणून मोठ्या प्रमाणावर कीटकनाशकं फवारली जातात. पावसाच्या पाण्यानं, इतर कारणांनी फवारणी केलेली ही कीटकनाशकं जमिनीत झिरपतात आणि हे झिरपणारं पाणी अखेर नदीच्या प्रवाहात मिसळतं. नदीतील असंख्य जलचर प्राणीमात्रांवर यांचा परिणाम होतो. यातल्या काही उपकारक जाती नामशेषही झालेल्या आहेत. याशिवाय मोठ्या प्रमाणावर होणारा रासायनिक खतांचा वापरही पाणीप्रदूषणास जबाबदार आहे. तुम्ही नदीकाठावर असणाऱ्या गावातील असाल किंवा तुम्हाला तलाव, विहिरीतून पाणी मिळत असेल, तरीही तुमचं पाणी दुषित असण्याची शक्यता असते.

नदीला मिळणारे नाले, घराघरातील सांडपाणी, शेतीशी निगडीत अशा जनावरांचे मलमूत्र यांचा पाण्यात होणारा निचरा तिचं पाणी दुषित करतात. शेतीत वापरली गेलेली रासायनिक खतं जमिनीत उतरतात आणि मग जमिनीत झिरपणाऱ्या पावसाच्या प्रवाहाबरोबर एक तर नदीत मिसळतात किंवां जमिनीवरून खाली खोल खडकात तयार होणाऱ्या पाण्याच्या साठ्यापर्यंत पोचतात. असा हा खडकातील प्रदूषित साठा अनेक वर्षं तसाच प्रदूषित राहतो, कारण तो साठा पिण्यासाठी योग्य करणं शक्य नाही. तो बाहेर काढूनच त्यावर प्रक्रिया करावी लागेल. यावर एकच उपाय, पाण्याचं होणारं प्रदूषण थांबवा.

**121. 'तोडगा' या शब्दाचा अर्थ नसलेला शब्द शोधा**

(1) मार्ग

(2) युक्ति

(3) उपाय

(4) प्रवृत्ती

**122. कोणत्या गोष्टी कायमच्या नाहीशा झाल्या आहेत, असे लेखकाला वाटते ?**

(1) प्रदूषण

(2) अनेक प्रकारचे रोग

(3) पाण्यातील काही जीव

(4) कीटक नाशके

**123. आपल्या नद्यांना लेखकाने कोणती उपमा दिली आहे ?**

(1) जीवनदायिनी
(2) कृष्णा
(3) गंगा
(4) जलचर

**124. 'संग्रह' या शब्दाची अर्थच्छटा पुढीलपैकी कोणत्या शब्दातून व्यक्त होते ?**

(1) काठ
(2) साठा
(3) प्रवाह
(4) खडक

**125. 'व्यथा' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सुचवा.**

(1) खेद
(2) क्लेश
(3) समाधान
(4) खंत

**126. लेखकाच्या मते पुढीलपैकी कोणत्या गोष्टीवर प्रक्रिया करावी लागते ?**

(1) रासायनिक खतं
(2) जमिनीतील पाणी
(3) कीटक नाशकं
(4) निर्माल्य

**127. लेखकाच्या मते आपण नदीच्या पाण्यात कोणती गोष्ट मिसळत/टाकत नाही ?**

(1) अन्न
(2) जलचर
(3) कीटक नाशकं
(4) निर्माल्य

**128. लेखकाला माणसांच्या कोणत्या कृती बद्दल खंत वाटते ?**

(1) पाण्याच्या स्वच्छते बद्दल काळजी घेण्याची
(2) पाण्याच्या स्वच्छते बद्दलच्या निष्काळजीपणाची
(3) जमिनीत पाणी झिरपण्वाच्या व्यवस्थापनाची
(4) रासायनिक खतांचा नियंत्रित वापर करण्याची

**पुढील उतारा वाचा आणि प्र.क्र. 129 ते 135 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

काळ बदलला तशी गावकूसही बदललीय. त्याने गावाची रया गेली असं जुनी माणसं म्हणतात. नव्या पिढीस जगणं सुसह्य झाल्यासारखं वाटतंय. माणसांचं येणं-जाणं, मालाची ने-आण सुलभ झालीय. परिणामी शहरातून आणाव्या लागणाऱ्या वस्तू आता गावातच मिळतात. आता गावात डझनावारी दुकानं झालीत. एके काळी गावात एकच दुकान होतं. ते जगन्नाथ वाण्याचं !

बापजाद्यांनी दुकानाला दिलेलं अस्ताव्यस्त कोनाड्याचं स्वरूप त्यानं बदललं होतं. आत-बाहेर खिसे असलेली जाड्याभरड्या कापडाची परण, ढगळ पायजमा, तळाशी नक्षीची किनार असलेली तपकिरी रंगाची पुठ्ठ्याच्या बांधणीची टोपी असा त्याचा वेश. डोईच्या पचपचीत तेलाचे थर टोपीवर उमटलेले असत. बुशशर्ट घातलेला असला, की त्याच्या कॉलरला आतून काळा तेलकट थर साचून राही, जणू वंगणच लावलेलं ! कपाळावर आठ्यांचं जाळं सदान्कदा पसरलेलं राही; नावाप्रमाणे जगाचा भार वाहावयाचा आहे की काय, असं वाटे ! त्याला मनमुराद हसताना कधी कुणी पाहिला नसावा, इतका त्याचा चेहरा कोरडा असायचा. रिकाम्या वेळेत पल्लेदार मिशांना ताव देणं हा त्याचा आवडता उद्योग. त्याच्या पसरट चेहऱ्यावर त्या मिशा बिलकुल शोभत नसत. व्हंडं कपाळ, खोबणीत गेलेले मिचमिचे डोळे, बसकं नाक, रुंद राठ ओठ, आखूड हनुवटी यामुळे त्याचा चेहरा बऱ्यापैकी षटकोनी दिसे ! तो कितीही साफसुफ राहत असला, तरी त्याच्या कपड्यांवर धुळीची, तेलाची पुटे चढत. त्याचा अवतार कळकटून जाई. दुकानातील नानाविध वस्तू एकत्र होऊन त्याचा एक वेगळाच दर्प त्याच्या अंगाला येई.

रिकाम्या वेळेत तो सतत कपडे झटकायचा, झटकणीनं इकडं तिकडं फडकं मारायचा. धूळ माशा उठवून लावायचा. पण त्यानं फारसा फरक पडत नसे. या

गोणीवरची धूळ त्या गोणीवर जाई, इकडच्या माशा तिकडे बसत. दातकोरणं पुडीत बांधून ठेवून उदबत्तीच्या काडीनं दातातल्या फटी तो कोरत राही. पुष्कळदा ती काडी ओठांच्या कोपऱ्यात बसून राही. तिला घोळवत त्याचा गिऱ्हाईकांशी संवाद चाले. त्याच्या हातात तांब्याचं जाडजूड कडं राही; डब्याडुबड्यावर कडं आदळून विशिष्ट आवाज काढला की त्याची पत्नी बायडाबाई ओळखायची की आपल्याला आवाज दिला जातोय. ती समोर यायची. मग जगन्नाथ तिला काम सांगायचा. धान्य मोजून द्यायचं, नरसाळं लावून रॉकेल ओतायचं, पानाची गड्डी मोजून द्याचयी.... अशी लहानसहान कामं बायडाबाईच्या वाट्यास येत. फावल्या वेळेत दोघे मिळून माल लावत. वजनवार पुड्या बांधून ठेवत. बायकोला नजरेच्या जरबेत ठेवणाऱ्या जगन्नाथाच्या ओठावर साखर, डोक्यावर बर्फ असायचा. कोंबडा आरवायच्या आधी त्यानं दुकानाची फळकुटं हटवलेली असत. फळ्या हटवून आतून आगळ सरकावून दार उघडलं, की दुकानदारी सुरू होई. गावातल्या लोकांना जे काही म्हणून लागे ते त्याच्या दुकानात मिळे. तेव्हा लोकांच्या गरजाही कमी होत्या, खाण्यापिण्याचे चोचलेही कमी होते. त्यामुळे मालाचे वाणही कमी होते. लोकही मिळेल त्या वस्तू घेत. नगाला नग असा सगळा मामला. हा व्यवहार क्वचित रोखीत होई; चीजवस्तूच्या बदल्यात पशाऐवजी धान्य दिले जाई. बहुतांशी उधारीच राही. वाण्याकडे चोपड्यांचा ढीग राही. दिमतीला एक दगडी पाटी होती, ज्यावर तो रोजची उधारी लिही. तीच उतार पुन्हा चोपडीत येई.

**129. 'गावाची रया गेली' या वाक्यातून लेखकाला काय सुचवायचे आहे ?**

(1) रोगराई नाहीशी होणे
(2) भरभराट होणे
(3) अतिवृष्टी होणे
(4) वैभव लोप पावणे

**130. 'दर्प' या शब्दाचा समानार्थी शब्द सुचवा.**

(1) वास्तव्य
(2) वायव्य
(3) वास
(4) वारुळ

**131. लेखकाच्या मते आधुनिक काळात गावात पुढीलपैकी कोणता बदल झाला नाही ?**

(1) जगणं सुसह्य झालं.
(2) दळण-वळण मर्यादित झालं.
(3) शहरातील वस्तू गावात उपलब्ध होऊ लागल्या
(4) गावाची रया गेली

**132. रिकाम्या वेळेत वाणी दंपत्ती कोणते काम करीत असे ?**

(1) कपडे झटकणे
(2) धूळ माशा उठवणे
(3) माल सामान लावणे
(4) गप्पा मारणे

**133. जगन्नाथ वाणी दैनंदिन व्यवहार कुठे नोंदीत असे ?**

(1) पाटीवर
(2) कागदावर
(3) गोणीवर
(4) फरशीवर

**134. 'तलफ' या शब्दाची अर्थच्छटा असलेला पर्याय निवडा.**

(1) इच्छा
(2) ईर्षा
(3) इप्सित
(4) आकस

**135. जगन्नाथ वाणी रिकाम्या वेळेत काय करीत नसे ?**

(1) कपडे झटकणे
(2) झटकणी मारणे
(3) गिऱ्हाइकांशी संवाद
(4) धूळ, माशा उठवणे

योग्य पर्याय निवडून प्रश्न क्र. 136 ते 150 या प्रश्नांची उत्तरे द्या :

**136.** शिक्षिका इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना पाठावर मुक्तपणे लेखन करण्यास सांगू शकते; जर पाठ ______ या विषयावर आधारित असेल

(1) सामाजिक मुद्दे
(2) राष्ट्रीय एकात्मता
(3) वैयक्तिक जीवन
(4) पर्यावरण संबंधी मुद्दे

**137.** अनौपचारिक पद्धतीतून भाषा शिकण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश केला जातो ?

(1) लँगवेज लॅब
(2) कौटुंबिक वातावरण
(3) भाषा शिक्षण केन्द्र
(4) शाळा

**138.** अगोदर वाचलेली तथा मुलांना सांगण्यास सांगणे यातून शिक्षिकेला कोणते मूल्यमापन करण्यास मदत होते ?

(1) स्मरण
(2) आकलन
(3) उच्चारण
(4) वर्णक्रम (Spelling)

**139.** लेखन अक्षमता म्हणजे ....

(1) डिस्लेक्सिया (Dyslexia)
(2) डिसग्राफिया (Dysgraphia)
(3) डिसकेलक्युलिया (Dyscalculia)
(4) डिस्फोरिया (Dysphoria)

**140.** वाचन म्हणजे नुसते पाठाचे उच्चारण नसते, तर ते ______ या दृष्टीनेही महत्वाचे असते.

(1) धाराप्रवाह वक्तृत्व
(2) पाठाचा अर्थ समजणे
(3) नवीन शब्द व वाक्य रचना समजणे
(4) नवीन शब्दांचे उच्चारण करण्यातील अउथळा दूर होणे.

**141.** पुढीलपैकी कोणत्या कारणास्तव प्राथमिक वर्गात मुलांना मातृभाषेत शिक्षण देण्याचे सुचविण्यात येते ?

(1) त्यांच्या प्रादेशिक बोलीला उत्तेजन देण्यासाठी
(2) नैसर्गिक वातावरण तयार करण्यासाठी
(3) कारण मुलांना कोणतीही भाषा येत नसते
(4) त्यांच्यातील सर्जनशीलतेला उत्तेजन देण्यासाठी

**142.** पहिल्या इयत्तेच्या भाषा पुस्तकात सुरुवातीला कविता, कथा असणे आणि नंतर वर्णमाला असणे. असे भाषा पुस्तक कोणत्या पद्धतीवर बेतलेले असते ?

(1) ऊर्ध्वगामी पद्धती (Bottom up approach)
(2) अधोगामी पद्धती (Top down approach)
(3) अनुशासनात्मक पद्धती (Disciplinary approach)
(4) अभ्यासक्रमाधिष्ठित पद्धती (Curriculum framework approach)

**143.** पुढीलपैकी कोणते विधान अचूक आहे ?

(1) पहिल्या इयत्तेच्या मुलांना इंग्रजी अजिबात येत नसते.
(2) मुलं आपल्या जवळील समृद्ध अनुभव घेऊन शाळेत येत असतात.
(3) मुलं शाळेत येतात तेव्हा ते एखाद्या कोऱ्या पाटी सारखे असतात.
(4) मुलांना भरपूर शब्द शिकवून भाषा शिकवली पाहिजे.

**144. मूलं प्रथम भाषा नैसर्गिकरित्या .....**

(1) शिकतात

(2) अनुकरण करतात

(3) आत्मसात करतात

(4) प्रबलन करतात

**145. पुढीलपैकी कोणत्या बाबीचा ग्रहण कौशल्यात (Receptive skills) समावेश होतो ?**

(1) श्रवण आणि उच्चारण

(2) श्रवण आणि वाचन

(3) वाचन आणि लेखन

(4) वाचन आणि उच्चारण

**146. शिक्षिका मुलांना 'विशेषणा' विषयी माहिती देते आणि त्यांना विशेषणाचे किमान एक वैशिष्ट्य अणि परिभाषा देण्यास सांगते. अशा पद्धतीला काय म्हणतात ?**

(1) उद्‌गामी पद्धती (Inductive Method)

(2) निगमनात्मक पद्धती (Deductive Method)

(3) समग्र शारीरिक प्रतिसाद पद्धती (TRP)

(4) कृतीत मग्न करण्याची पद्धती (Immersion Method)

**147. औपचारिक पद्धतीत शिक्षकाच्या मदतीने पुढीलपैकी कोणती भाषा शिकता येते ?**

(1) प्रथम भाषा

(2) द्वितीय भाषा

(3) मातृभाषा

(4) कुटुंबाची भाषा

**148. मुलानां नवीन शब्द शिकवताना शिक्षिका नमुन्यादाखल खऱ्याखुऱ्या वस्तूचा वापर करते. असे केल्याने .....**

(1) वस्तूंच्या मदतीने आपल्याला नवीन शब्द शिकता येतात.

(2) शब्द अचूक शिकवता येतात

(3) त्यांना वास्तव जीवनात पाहिलेल्या वस्तूचा त्या शब्दाशी संबंध लावता येतो

(4) मुले अमूर्त कल्पना करू शकत नाही म्हणून प्रत्यक्ष वस्तूच्या आधारे त्यांना शिकता येते.

**149. भाषेच्या अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश करण्यात यावा कारण ---**

(1) ते प्रमाण भाषा अध्ययन अध्यापनाचे माध्यम आहे.

(2) त्याने त्यांची समीक्षक वृत्ती विकसित होते.

(3) असे केल्याने मुलांवरील अभ्यासक्रमाचा भार कमी होतो.

(4) त्याने मुलांना नवीन शब्द शिकण्यास मदत होते.

**150. भाषा वर्गात गोष्ट सांगणे ही एक महत्त्वपूर्ण कृती आहे, कारण ....**

(1) यातून मूल्य शिक्षण दिले जाते.

(2) हे मनोरंजनाचे उत्तम साधन आहे.

(3) असे केल्याने शिक्षकांना विश्रांती मिलते.

(4) यातूत भाषेचे समग्र सादरीकरण होते.

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/विची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्वीच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल / कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY:**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/ room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/ rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/ Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***